**ठळक बातम्या**

- दुर्मिळ होत असलेल्या वनस्पतींच्या जतन आणि संवर्धनावर भर देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश /पाणमांजर, गिधाड, रानम्हैस यांच्या प्रजनन केंद्रासाठी दिली मान्यता
- जिल्हाकेंद्री विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पाची मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात
- आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा वाढवण्यासाठी पाठिंबा असल्याचं शरद पवार यांचं प्रतिपादन

**आणि**

- देशातल्या शैक्षणिक संस्थांच्या मानांकनात आयआयटी मुंबई तिसऱ्या स्थानावर

**<><><><><>**

पाणमांजर, गिधाड, रानम्हैस यांच्या प्रजनन केंद्रासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. राज्य वन्य जीव मंडळाच्या आज मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यावेळी पेंच इथं पाणमांजर, नाशिकमधे गिधाड, तर गडचिरोलीत रानम्हैस प्रजनन केंद्र उभारण्याविषयी चर्चा झाली. राज्यात दुर्मिळ होत असलेल्या वनस्पतींच्या जतन आणि संवर्धनावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सातारा जिल्ह्यातल्या जावळीच्या जंगलात ५०० प्रकारच्या दुर्मिळ वनस्पती असल्याचं सांगत, त्याठिकाणी संशोधन आणि विकास केंद्र सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संरक्षित क्षेत्र आणि पर्यावरण संवेदनशील क्षेत्र, व्याघ्र भ्रमण मार्गातल्या चार विकास प्रकल्पांना मान्यता देण्यात आली.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबातल्या सदस्याला वनमजूर म्हणून सामावून घेण्याचा निर्णय देखील मुख्यमंत्र्यांनी घेतला. सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे, तसंच सर्पदंशावर तात्काळ उपचार मिळावेत यासाठी क्लिनिक ऑन व्हील उपक्रम सुरू करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

गावांमध्ये वन्य प्राण्यांकडून होणारी पिकांची नासाडी रोखण्यासाठी पथक नेमतानाच, वनपाटील नेमण्याबाबतही या बैठकीत चर्चा झाली. 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राज्यातल्या सर्व महापालिका, नगरपालिका, शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रभावीपणे राबवण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. वन मंत्री सुधीर मुनगंटीवार दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते.

<><><><><>

जिल्हाकेंद्री विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. या प्रकल्पाला जागतिक बँकेकडून १ हजार ५६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

'मित्र' अर्थात महाराष्ट्र इन्स्टिटट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाची बैठक आज मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झाली. 'मित्र'नं कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा, ऊर्जा या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करावं, मुंबईसह मुंबई महानगर परिसरातल्या पूरक बाबींवर लक्ष केंद्रित करावं, तसंच सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

यावेळी नीती आयोगाच्या धर्तीवर 'मित्र'नं चार संस्थांशी नॉलेज पार्टनर म्हणून सामंजस्य करार केला.

<><><><><>

महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यावरुन दोन समाजात कटुता निर्माण होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून यावर तोडगा काढावा, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. राज्यातलं सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी असं आपल्याला वाटतं, यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना सर्वपक्षीय बैठक बोलावून तोडगा काढण्याविषयी सुचवलं, असं पवार म्हणाले. राज्यात सौहार्द निर्माण करण्यासाठी या बैठकीत एकमताने जो निर्णय होईल तो आपल्याला मान्य असेल असंही पवार यांनी सांगितलं.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही, हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, त्यासाठी आपल्या पक्षाचा पाठिंबा असेल, असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटप सर्व घटकपक्षांचे नेते एकत्र बसून ठरवतील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सांगितलं. त्यांच्या उपस्थितीत आज धुळे शहरात 'जन सन्मान यात्रा' झाली, त्यावेळी ते बोलत होते.

जागा वाटपाचा निर्णय योग्य पध्दतीनं होईल. काम करणाऱ्याच्या पाठीशी पक्ष उभा राहिल, असं ते म्हणाले. निवडणुकीनंतर पुन्हा आमचं सरकार येईल, असा विश्वासही अजीत पवार यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही

तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेता उमेश कामत म्हणाले....

**होल्ड--बाईट - उमेश कामत**

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं देशभरातल्या शैक्षणिक संस्थांचं मानांकन जाहीर केलं आहे. या यादीत सर्वसाधारण गटात पहिला क्रमांक आयआयटी मद्रासने पटकावला असून आयआयटी मुंबई तिसऱ्या स्थानावर आहे. दुसरा क्रमांक बंगळुरूच्या इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स ला मिळाला आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नवी दिल्लीत एका कार्यक्रमात ही मानांकनं जाहीर करताना सांगितलं की यंदापासून कौशल्य विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ आणि राज्यसरकारी विद्यापीठ अशा आणखी तीन गटातही शैक्षणिक संस्थांना मानांकनं मिळणार आहे. एकूण १६ गटांमधे ही मानांकनं देण्यात आली असून सर्वसाधारण गटात महाराष्ट्रातल्या १० संस्थांचा समावेश आहे. अभियांत्रिकी गटात आयआयटी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. वैद्यकीय शिक्षण गटात डी वाय पाटील विद्यापीठ ११व्या क्रमांकावर आहे तर कायद्याचं शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या गटात पुण्याचं सिम्बायोसिस लॉ स्कूल पाचव्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

राज्यात पावसाचा जोर काहीसा ओसरला, तरी विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. सिंचन प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रांमध्येही चांगला पाऊस झाल्यानं जलसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या विदर्भातल्या सहा मोठ्या प्रकल्पांमधून विसर्ग सुरू आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातल्या उर्ध्व **वर्धा, यवतमाळ** जिल्ह्यातल्या बेंबळा, **नागपूर** जिल्ह्यातल्या पेंच तोतलाडोह, गोंदिया जिल्ह्यातल्या इटियाडोह, भंडारा जिल्ह्यातल्या गोसीखुर्द,

आणि वर्धा जिल्ह्यातल्या निम्न वर्धा प्रकल्पांचा समावेश आहे. वैनगंगा, वर्धा आणि बेंबळा नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागपूर विभागातल्या मोठ्या प्रकल्पांमध्ये ७४ पूर्णांक ११ टक्के, तर अमरावती विभागातल्या प्रकल्पांमध्ये ६० पूर्णांक १२ टक्के पाणीसाठा झाला आहे.

**//<><><><><>//**